तांत्रिक अधिकारी (पुरवठा), गट-ब (राजपत्रित) या संवर्गातील अधिकारी यांच्या नियतकालिक / प्रशासकीय बदल्या-२०२६.

**महाराष्ट्र शासन**
**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**
**शासन आदेश क्रमांक : बदली-२३२६/प्र.क्र.३०/ना.पु.१५**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०९ जून, २०२६.

संदर्भ : १) महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१.
२) महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५.
३) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग दि.०९.०४.२०१८
४) नागरी सेवा मंडळाची शिफारस दिनांक १४.०५.२०२६

**-: शासन आदेश :-**

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम ४ मधील तरतूदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेनुसार या विभागाच्या क्षेत्रिय पुरवठा आस्थापनेच्या अधिपत्याखालील तांत्रिक अधिकारी (पुरवठा), गट-ब (राजपत्रित) या संवर्गातील खालील तक्त्यात नमूद अधिकाऱ्याची त्यांच्या नावासमोरील स्तंभ ४ मध्ये दर्शविलेल्या ठिकाणी नियतकालिक / प्रशासकीय बदली करण्यात येत आहे :-.

**नियतकालिक बदली सन-२०२६**

| अ.क्र. | अधिकारी यांचे नाव | सध्या कार्यरत | बदलीनंतरची पदस्थापना |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | **श्री. संतोष मन्मथ सरडे** | **तांत्रिक अधिकारी, विभागीय आयुक्त कार्यालय (पुरवठा), पुणे विभाग, पुणे.** | **तांत्रिक अधिकारी, विभागीय आयुक्त कार्यालय (पुरवठा), नागपूर विभाग, नागपूर.** |

२. श्री. संतोष सरडे, तांत्रिक अधिकारी यांना या आदेशान्वये एकतर्फी कार्यमुक्त करण्यात येत आहे. श्री.सरडे यांनी बदलीच्या पदावर तात्काळ रुजू व्हावे. तसेच, संबंधित विभागीय आयुक्त (पुरवठा) यांनी श्री. सरडे यांना बदलीच्या ठिकाणी तातडीने रुजू करुन घेऊन त्याबाबतचा अहवाल शासनास napu15.mhpds@gov.in या ई-मेल वर सादर करावा.

३. श्री. संतोष सरडे, तांत्रिक अधिकारी यांची नियतकालीक बदली असल्याने त्यांना बदलीच्या ठिकाणी रुजू होण्याकरीता महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१ मधील तरतूदीनुसार पदग्रहण अवधी तसेच बदली विषयक प्रवास भत्ता व इतर अनुषंगिक लाभ अनुज्ञेय आहे.

४. श्री. संतोष सरडे, तांत्रिक अधिकारी यांनी बदली रद्द करणे अथवा त्यासाठी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरित्या दबाव आणून बदली रद्द करण्याचा प्रयत्न केल्यास, ही कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियमि २३ चे उल्लंघन करणारी असल्यामुळे ती गैरवर्तणुक समजून त्यांचेविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, यांची संबंधितांनी नोंद घ्यावी.

५. सदरप्रमाणे पदस्थापना करण्यात आलेल्या श्री.सरडे यांना पुर्वपरवानगीशिवाय कोणत्याही प्रकारची रजा मंजूर करु नये व महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मधील नियम ३० (सी) नुसार मुळ कार्यालयाने पदस्थापना झालेल्या अधिकाऱ्याचे कोणत्याही प्रकारचे रजेचे अर्ज स्विकारु नयेत. असे अर्ज प्राप्त झाल्यास ते संबंधित मुळ पत्त्यावर नोंदणी पोचदेय डाकेने परत करावेत.

६. महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ४ व कलम ६ च्या तरतुदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्याने प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून या बदल्या करण्यात आल्या आहेत. सदर आदेशाचे पालन न करणे ही बाब गंभीर स्वरुपाची असून यामुळे पालन न करणारा अधिकारी, विभागीय चौकशी नियम पुस्तिका, १९९१ च्या प्रकरण २ मधील कलम २.१ (२) (पाच) अन्वये निलंबनाच्या कार्यवाहीस पात्र राहील.

७. श्री. संतोष सरडे, तांत्रिक अधिकारी यांनी विहित पदग्रहण अवधीमध्ये बदलीच्या ठिकाणी रुजू व्हावे. अन्यथा, अनुपस्थितीचा कालावधी हा अकार्यदिन (dies non) म्हणून गणला जाईल.

८. श्री.संतोष सरडे, तांत्रिक अधिकारी, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, पुणे यांच्याकडे सोपविण्यात आलेला जिल्हा पुरवठा अधिकारी, सोलापूर या रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार या आदेशान्वये संपुष्टात येत आहे. तरी, जिल्हा पुरवठा अधिकारी, सोलापूर या रिक्त पदाच्या कार्यभाराचे पुढील आदेश यथावकाश निर्गमित करण्यात येतील.

९. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०६०९१२४३४६१८०६ असा आहे. सदर आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRAMOD ABAJI PATIL

Digitally signed by PRAMOD ABAJI PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FCSCPD, 2.5.4.20=4A3B99D57D257E955ED34CA51DB1F3C521002555E05C455E86FA1C9C82A1D82B, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=68D5A8ABFFDD75CBA24301AA39C12B40983F304D7267796A32B42D4D558F1A1F, cn=PRAMOD ABAJI PATIL
Date: 2026.06.09 12:44:29 +05'30'

**(प्रमोद पाटील)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

श्री. संतोष मन्मथ सरडे, तांत्रिक अधिकारी, विभागीय आयुक्त कार्यालय (पुरवठा), पुणे विभाग, पुणे
**(मार्फत विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, पुणे)**

प्रत,

१) मा. मुख्यमंत्री महोदय, मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव.
२) मा. मंत्री (अ.ना.पु.व ग्रा.सं.), मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव.
३) मा. राज्यमंत्री (अ.ना.पु. व ग्रा.सं.), मंत्रालय, मुंबई यांचे खाजगी सचिव.
४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता /लेखा परीक्षा) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
५) अ.मु.स., अ.ना.पु.व ग्रा.सं. वि., मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक.
६) विभागीय आयुक्त, पुणे विभाग/ नागपूर विभाग.
७) जिल्हाधिकारी, पुणे /नागपूर .
८) उप आयुक्त (पुरवठा), पुणे विभाग / नागपूर विभाग.
९) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे /नागपूर .
१०) निवडनस्ती (ना.पु. १५).